# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.11.2025** **वार- बुधवार**

---

**राज्यपाल**

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज पुण्यात जेबीएम समुहाच्या 'सर्वोत्कर्ष' कार्यक्रमात उपस्थित राहून, सामाजिक उपक्रमातील सहभागाबद्दल समूहाची प्रशंसा केली. रोजगारनिर्मिती, तंत्रज्ञान, नवीन उपक्रम, स्वच्छ ऊर्जा, स्वयंचलित वाहन उत्पादन आणि सामाजिक उत्तरदायित्व अश्या विविध क्षेत्रांमध्ये समूहानं लक्षणीय काम केलं आहे, असं राज्यपाल म्हणाले. जेबीएम समूहानं देशातल्या 60 आणि परदेशातल्या 17 उद्योग संस्थांच्या माध्यमातून हजारो युवकांना रोजगार दिला असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

**जयंती**

भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा जन्मदिवस आज राष्ट्रीय एकात्मता दिन म्हणून साजरा करण्यात आला. पुण्यातल्या सावित्रीबाई फुले विद्यापीठात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं. कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली.

**पुणे जिल्हा परिषद निवडणूक**

पुणे जिल्ह्यातल्या 14 नगरपरिषदा आणि तीन नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांच्या छाननीत अध्यक्षपदासाठीचे 26 अर्ज तर सदस्य पदासाठीचे 404 अर्ज बाद ठरविण्यात आले. दाखल अर्जांची काल छाननी करण्यात आली. त्यामुळे अध्यक्षपदासाठी 141, तर सदस्य पदासाठी 1,945 अर्ज वैध ठरले आहेत. उमेदवारांना अर्ज मागे घेण्याची मुदत शुक्रवारपर्यंत आहे.

**शिक्षक परीक्षा**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीनं राज्यात येत्या रविवारी ‘महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा’ घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी राज्यातून 4 लाख 75 हजार 668 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील दोन लाखा पेक्षा जास्त विद्यार्थी ‘टीईटी’चे दोन्ही पेपर देणार आहेत. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा ‘टीईटी’ परीक्षेसाठी आलेल्या अर्जांची संख्या तुलनेनं वाढली आहे.

ही परीक्षा मराठी, इंग्रजी, उर्दू, हिंदी, बंगाली, कन्नड, तेलगू, गुजराती आणि सिंधी अशा नऊ माध्यमांत घेतली जात आहे. ही परीक्षा राज्यातील एक हजार 423 परीक्षा केंद्रांवर होणार आहे, अशी माहिती राज्य परीक्षा परिषदेनं दिली आहे.

**नवलेपूल**

नवले पूल परिसरात अपघात होऊ नयेत, यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. या मार्गावरील सेवा रस्त्याचं काम तातडीनं पूर्ण करण्याची मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. सुळे यांनी नवले पूल अपघात परिसराची पाहणी केली त्यानंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या.

रस्त्याची सुरक्षा हा विषय देशभर एकत्रितपणे उपाययोजना करून सोडवला पाहिजे. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा लागेल, ज्यामुळं अपघातांची संख्या शून्य होईलं असं सुळे म्हणाल्या.

**कुष्ठरोग अभियान**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात 17 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर  या कालावधीत संपूर्ण राज्यभर कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येत आहे.

या उपक्रमात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत घराघरांत जाऊन नागरिकांची मोफत तपासणी केली जात आहे. आशा स्वयंसेविका आणि प्रशिक्षित स्वयंसेवक गृहभेटी देत असून कुष्ठरोगाच्या संभाव्य लक्षणांची प्रत्यक्ष तपासणी करत आहेत. कोणतीही संशयास्पद लक्षणे आढळल्यास रुग्णांना तात्काळ महापालिका रुग्णालयांमध्ये पुढील निदान आणि उपचारासाठी पाठविण्यात येत आहे.

**सक्षमा प्रकल्प**

पिंपरी चिंचवड महापालिका समाज विकास विभाग आणि टाटा स्ट्राईव्ह हे संयुक्तपणे महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'सक्षमा' हा प्रकल्प राबवत आहेत. यामध्ये बचत गटातील महिलांना शाश्वत रोजगार मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या प्रकल्पा अंतर्गत लवळे  इथं नुकतंच महिलांच्या हस्तनिर्मित वस्तूंचं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं.

**लाक्षणिक बंद**

व्यापाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडं शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ येत्या 5 डिसेंबरला राज्यव्यापी लाक्षणिक बंद पाळण्यात आहे, अशी माहिती मार्केट यार्ड इथल्या 'दि पूना मर्चंट्स चेंबर' कडून घेण्या आला आहे. बाजार समितीतील कायदे, राष्ट्रीय बाजार समिती प्रस्तावित धोरणातील त्रुटी, तसंच अन्न सुरक्षा आणि मानदे कायद्यान्वयं व्यापाऱ्यांवर होत असलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर परिषदेत सहभागी झालेल्या व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.

**पुरस्कार**

ग.दि.माडगूळकर यांच्या स्मरणार्थ गदिमा प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा गदिमा पुरस्कार यंदा ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना देण्यात येणार आहे, अशी माहिती गदिमा प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त आनंद माडगूळकर यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली. एकवीस हजार रूपये, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या 14 डिसेंबरला ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते  पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात थंडीचा कडाका वाढला आहे. किमान तापमान 9 पूर्णांक 5  दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही किमान तापमान साधारण असंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**